दिनांकः २३/०९/२०१९ // १५//

नियमित दिवाणी मुकदमा क्र. ४३/२०१४
नि. १११ लगत

**<u>शपथेवर सुरू</u>**

**<u>पुढील सरतपास प्रतिवादीतर्फे विधिज्ञ श्री. एस्.एस्.सावंत यांचेतर्फे</u>**

**९.** मी प्रतिवादी क्र. १, ३ व ४ यांनी मला दिलेले मुळ अखत्यारपत्र फेरिस्त नि. <u>१०९/१</u> कडे हजर केलेले आहे. सदरचे अखत्यारपत्र **<u>नि. ११८</u>** कडे आहे. माझा भाउ बाबाजी बागवे यांस वादीच्या आईने ॲड. श्री. संग्राम देसाई यांच्यामार्फत एक रजिस्टर पोष्टाने दिनांक २५/११/१९९७ रोजी पाठविलेली नोटीस मी फेरिस्त नि. <u>८५/१</u> कडे हजर केली आहे. सदरची नोटीस **<u>नि. ११९</u>** कडे आहे. (वादीच्या विधिज्ञांनी नोटीसीस निशाण देण्यास आक्षेप नोंदविला, प्रतिवादीच्या वकीलांनी सदरची नोटीस वादीच्या आईने वकीलांमार्फत पाठविलेली नोटीस असल्याने त्यास निशाण देण्याची विनंती केली. सदरची नोटीस प्रतिवादीने प्राप्त केलेली आहे. परंतु ती नोटीस वादी क्र. १ ते ४ यांनी दिलेली नाही. त्यामुळे सदरच्या नोटीसीस केवळ ओळखीसाठी नि. ११९ देण्यात येत आहे. ) वरील नोटीस ज्या लखोटयाने प्राप्त झाली तो लखोटा मी फेरिस्त नि. <u>१०९/९</u> कडे हजर केलेला आहे. सदरच्या लखोटयास **<u>नि.१२०</u>** देण्यात येत आहे. (वादीच्या विधिज्ञांनी लखोटयास निशाण देण्यास हरकत नोंदविली आहे. प्रतिवादीच्या विधिज्ञांनी सदरच्या लखोटयास जनरल क्लॉजेस ॲक्ट कलम २७ नुसार गृहितक आहे. सदर कायदयातील तरतुदीनुसार सदरच्या लखोटयास निशाण नि. १२० देण्यात येत आहे.) रामचंद्र बाळकृष्ण बागवे यांना मी पाठविलेल्या मनिऑर्डरची पोहोच पावती फेरिस्त नि.८५/२ कडे हजर केली असून त्यावर रामचंद्र बाळकृष्ण बागवे यांची सही व सोनू जगन्नाथ घाडीगांवकर यांची साक्षीदार म्हणून सही आहे. सदरची पावती **<u>नि. १२१</u>** कडे आहे. (वादीच्या विधिज्ञांनी सदरच्या पावतीस निशाण देण्यास हरकत नोंदविली आहे. प्रतिवादीच्या विधिज्ञांनी सदरची मनिऑर्डर प्रतिवादीने पोष्टाने पाठविल्याने त्यास जनरल क्लॉजेस ॲक्ट कलम २७ नुसार गृहितक आहे. सदर कायदयातील तरतुदीनुसार सदरच्या लखोटयास निशाण नि. १२१ देण्यात येत आहे.) मी माझी काकी राधाबाई

बाळकृष्ण बागवे यांना पाठविलेल्या एक हजार रूपयाची मनिऑर्डरची पोहोच पावती फेरिस्त नि.८५/३ कडे हजर केली असून त्यावर राधाबाई बाळकृष्ण बागवे यांचा अंगठा व उज्वला लक्ष्मण परब हिची साक्षीदार म्हणून सही आहे. सदरची पावती **<u>नि. १२२</u>** कडे आहे. (वादीच्या विधिज्ञांनी सदरच्या पावतीस निशाण देण्यास हरकत नोंदविली आहे. प्रतिवादीच्या विधिज्ञांनी सदरची मनिऑर्डर प्रतिवादीने पोष्टाने पाठविल्याने त्यास जनरल क्लॉजेस ॲक्ट कलम २७ नुसार गृहितक आहे. सदर कायदयातील तरतुदीनुसार सदरच्या लखोटयास निशाण नि. १२२ देण्यात येत आहे.) बाळकृष्ण बागवे यांना मी पाठविलेल्या रक्कम रूपये पाचशेची दिनांक ०६/०९/१९९५ रोजीची मनिऑर्डरची पोहोच पावती फेरिस्त नि.८५/४ कडे हजर केली असून त्यावर बाळकृष्ण बागवे यांची सही व रामचंद्र महादेव परब यांची साक्षीदार म्हणून सही आहे. सदरची पावती **<u>नि. १२३</u>** कडे आहे. (वादीच्या विधिज्ञांनी सदरच्या पावतीस निशाण देण्यास हरकत नोंदविली आहे. प्रतिवादीच्या विधिज्ञांनी सदरची मनिऑर्डर प्रतिवादीने पोष्टाने पाठविल्याने त्यास जनरल क्लॉजेस ॲक्ट कलम २७ नुसार गृहितक आहे. सदर कायदयातील तरतुदीनुसार सदरच्या लखोटयास निशाण नि. १२३ देण्यात येत आहे.) राधाबाई बाळकृष्ण बागवे यांना मी पाठविलेल्या रूपये चारशेची मनिऑर्डरची दिनांक २७/०८/१९९८ ची पोहोच पावती फेरिस्त नि.८५/५ कडे हजर केली असून त्यावर राधाबाई बाळकृष्ण बागवे यांचा अंगठा असून रामचंद्र बाळकृष्ण बागवे यांनी ओळख घातली आहे. सदरची पावती **<u>नि. १२४</u>** कडे आहे. (वादीच्या विधिज्ञांनी सदरच्या पावतीस निशाण देण्यास हरकत नोंदविली आहे. प्रतिवादीच्या विधिज्ञांनी सदरची मनिऑर्डर प्रतिवादीने पोष्टाने पाठविल्याने त्यास जनरल क्लॉजेस ॲक्ट कलम २७ नुसार गृहितक आहे. सदर कायदयातील तरतुदीनुसार सदरच्या लखोटयास निशाण नि. १२४ देण्यात येत आहे.) राधाबाई बाळकृष्ण बागवे यांना मी पाठविलेल्या रूपये शंभरची मनिऑर्डरची पोहोच पावती फेरिस्त नि.८५/६ कडे हजर केली असून त्यावर राधाबाई बाळकृष्ण बागवे यांचा अंगठा असून रामचंद्र बाळकृष्ण बागवे यांनी ओळख घातली आहे. सदरची पावती **<u>नि.</u>**

**<u>१२५</u>** कडे आहे. (वादीच्या विधिज्ञांनी सदरच्या पावतीस निशाण देण्यास हरकत नोंदविली आहे. प्रतिवादीच्या विधिज्ञांनी सदरची मनिऑर्डर प्रतिवादीने पोष्टाने पाठविल्याने त्यास जनरल क्लॉजेस ॲक्ट कलम २७ नुसार गृहितक आहे. सदर कायदयातील तरतुदीनुसार सदरच्या लखोटयास निशाण नि. १२५ देण्यात येत आहे.) फेरिस्त <u>नि.८५/७</u> कडे दावा मिळकतीची खातेपुस्तिका मी हजर केली आहे. सदरची पुस्तीका **<u>नि. १२६</u>** कडे आहे. (सदरच्या खाते पुस्तिकेस वादीतर्फे वकीलांनी निशाण देण्यास हरकत नोंदवली आहे. सदरच्या आक्षेपाचा अंतिम युक्तीवादावेळी विचार करण्यात येईल). माझी काकी राधाबाई बाळकृष्ण बागवे हिला मी पाठविलेल्या १००/— रूपये मनिऑर्डरची दिनांक ०५/०९/१९८८ ची पावती फेरिस्त नि. <u>९०/१</u> कडे हजर केली आहे. त्यावर राधाबाई हिचा अंगठा व शिवाजी परब यांची सही आहे. सदरची पावती **<u>नि. १२७</u>** कडे आहे. (वादीच्या विधिज्ञांनी सदरच्या पावतीस निशाण देण्यास हरकत नोंदविली आहे. प्रतिवादीच्या विधिज्ञांनी सदरची मनिऑर्डर प्रतिवादीने पोष्टाने पाठविल्याने त्यास जनरल क्लॉजेस ॲक्ट कलम २७ नुसार गृहितक आहे. सदर कायदयातील तरतुदीनुसार सदरच्या लखोटयास निशाण नि. १२७ देण्यात येत आहे.)

१०. आता मला नि. ९३ कडे असलेल्या अल्बम मधील अ.क्र.१ व २ कडील छायाचित्र दाखवली. सदरचे पहिले छायाचित्र इमला क्र. १५३ च्या गृहप्रवेशा दिवसाचे आहे. दुस—या छायाचित्रात रमाकांत बाळकृष्ण बागवे व त्याची पत्नी पुजेला बसल्याचे व मागे माझा मोठा भाउ बाबाजी लक्ष्मण बागवे (पांढरा सदरचा घातलेला) उभा असलेला दिसत आहे. आता मला नि. ९३ कडे असलेल्या अल्बम मधील अ.क्र.३ कडील छायाचित्र दाखवले. त्यामध्ये माझी मावशी व तिचे पती उभे असलेले दिसत आहेत. आता मला नि. ९३ कडे असलेल्या अल्बम मधील अ.क्र.४ कडील छायाचित्र दाखवले. सदरच्या छायाचित्रात आम्ही घरातील सर्व मंडळी गा—हाणे घालीत असताना दिसून येत आहेत. त्यात मी स्वत:, रमाकांत व त्याची बायको, माझा भाउ बाबाजी व त्याची

बायको, माझा मुलगा व मोठया भावाची मुलगी, माझी आई आणि भावोजी रमेश खांदारे, राधाबाई बागवे अशी दिसत आहोत. आता मला नि. ९३ कडे असलेल्या अल्बम मधील अ.क्र.५ कडील छायाचित्र दाखवले. सदरचे छायाचित्र घर क्र. १५३ मधीलच आहे. त्यामध्ये रमाकांत बाळकृष्ण बागवे व त्यांची बायको व त्यांच्या दोन मुली व एक मुलगा दिसत आहेत. आता मला नि. ९३ कडे असलेल्या अल्बम मधील अ.क्र.६ कडील छायाचित्र दाखवले.त्यामध्ये जेवणाची पंगत दिसून येते. पंगतीत माझे सासरे रामचंद्र बाबु राणे, रमेश खांदारे, गांवातील लाड दिसून येत आहेत. आता मला नि. ९३ कडे असलेल्या अल्बम मधील अ. क्र.७ कडील छायाचित्र दाखवले. सदरच्या छायाचित्रात आम्ही घरातील सर्व मंडळी गा—हाणे घालीत असताना दिसून येत आहेत. त्यात मी स्वत:, रमाकांत व त्याची बायको, माझा भाउ बाबाजी व त्याची बायको, माझा मुलगा व मोठया भावाची मुलगी, माझी आई आणि भावोजी रमेश खांदारे, राधाबाई बागवे अशी दिसत आहोत. आता मला नि. ९३ कडे असलेल्या अल्बम मधील अ.क्र.८ कडील छायाचित्र दाखवले. त्यामध्ये माझी बहिण, भावोजी व तिची नणंद पंढरी दिसत आहेत. आता मला नि. ९३ कडे असलेल्या अल्बम मधील अ.क्र.९ कडील छायाचित्र दाखवले. सदरच्या छायाचित्रात आहेर करताना दिसून येत आहे. त्यामध्ये रमाकांत बाळकृष्ण बागवे व त्यांच्या बायकोला माझी बहिण व भावोजी आहेर करीत आहेत. आता मला नि. ९३ कडे असलेल्या अल्बम मधील अ.क्र. १० कडील छायाचित्र दाखवले. त्यामध्ये होमाच्या आधीचा विधी (गोमुत्र शिंपडणे) सुरू आहे. त्यामध्ये गा—हाण्याच्यावेळी असलेली सर्व मंडळी बसलेली आहेत. आता मला नि. ९३ कडे असलेल्या अल्बम मधील अ.क्र.११ कडील छायाचित्र दाखवले. तो होमाचा फोटो आहे. त्यात रमाकांत व त्याची पत्नी पाठमोरे दिसत आहेत. आता मला नि. ९३ कडे असलेल्या अल्बम मधील अ.क्र.१२ कडील छायाचित्र दाखवले. त्यात माझे सासरे रमाकांतला आहेर करीत असताना दिसून येत आहेत व समोर माझा भाउ उभा आहे. आता मला नि. ९३ कडे असलेल्या अल्बम मधील अ.क्र.१३, १४ व १५ कडील छायाचित्र दाखवले. सदरची

छायाचित्र घर क्र. १५३ ची लांबून घेतलेली छायाचित्र आहेत. आता मला नि. ९३ कडे असलेल्या अल्बम मधील अ.क्र.१६ कडील छायाचित्र दाखवले. सदरचा फोटो घर क्र. १५३ चा असून त्यामध्ये माझा भाउ बाबाजी, भावजय जयश्री व पुतणी तनुजा दिसत आहे. आता मला नि. ९३ कडे असलेल्या अल्बम मधील अ.क्र.१७ व १८ कडील छायाचित्र दाखवले. सदरची छायाचित्र गांवातील तसेच पाहुणे मंडळी गृहप्रवेशाच्यावेळी जेवण करतेवेळीचे फोटो आहेत. आता मला नि. ९३ कडे असलेल्या अल्बम मधील अ.क्र.१९ कडील छायाचित्र दाखवले. सदरचा फोटो घर क्र. १५३ चा असून त्यामध्ये राधाबाई बागवे यांना माझी बहिण व भावोजी भेटवस्तु देताना दिसत आहेत. तसेच त्यामध्ये माझा भाउ बाबाजी दिसत आहे. आता मला नि. ९३ कडे असलेल्या अल्बम मधील अ.क्र.२० कडील छायाचित्र दाखवले. ते छायाचित्र होम संपल्यानंतर नमस्कार करतानाचा आहे. त्यामध्ये रमाकांत बागवे, त्याची बायको व माझी वहिनी जयश्री दिसत आहेत. माझी वहिनी रमाकांतच्या बायकोच्या पाठीमागे उभी आहे. सदरची सर्व छायाचित्र गृहप्रवेशाच्यावेळची आहेत.

११. रामचंद्र अनंत दळवी यांनी दिनांक ०३/०४/२००५ रोजी रक्कम रूपये एक लाख मिळाल्याबाबत लिहून दिलेली पावती मी फेरिस्त नि. १०९/५ कडे हजर केलेली आहे. सदरची पावती साक्षीदार सोमनाथ दत्ताराम गोसावी व दिगंबर भाउ दळवी यांच्यासमक्ष आम्हाला लिहून दिली होती. सदरची पावती **नि. १२८** कडे आहे. (सदरच्या पावतीस निशाणी देण्यास वादीतर्फे विधिज्ञांनी आक्षेप नोंदविला. सदरचा आक्षेप अंतिम युक्तीवादाच्यावेळीस ग्राहय धरला जाईल.) बाळकृष्ण फॅब्रीकेटर्सचे मालक बाळकृष्ण परब यांनी इमला क्र. १५३ येथे त्यांनी केलेल्या कामाचे पैसे त्यांना पोहोच झाल्याबाबतची पोहोच दिनांक २३/०३/२००५ रोजीच्या त्यांच्या लेटर हेडवर दिली होती. सदरची पोहोच **नि.१२९** कडे आहे. (सदरच्या पावतीस निशाणी देण्यास वादीतर्फे विधिज्ञांनी आक्षेप नोंदविला. सदरचा आक्षेप अंतिम युक्तीवादाच्यावेळीस ग्राहय धरला जाईल.) बाळकृष्ण परब सध्या हयात नाहित.

//२०//

नियमित दिवाणी मुकदमा क्र. ४३/२०१४
नि. १११ लगत

१२. मी फेरिस्त नि. १०९/७ कडे इमला क्र. २३५ ची सन १९८४—८५ च्या कर पावतीची झेरॉक्स प्रत जोडली आहे. सदरची झेरॉक्स प्रत **नि. १३०** कडे आहे. (नि. ११० कडील आदेशानुसार निशाणी दिली.) इमला क्र. २३५ चा सध्याचा क्रमांक १५३ आहे. नि.१०९/१० कडे मी माझा जिल्हा परिषद शाळा कुंदे क्र.१ ची शाळा सोडल्याच्या दाखल्याची सहीसुद नक्कल दाखल केली आहे. सदरचा दाखला साक्षीदाराने आपण कुंदे गांवचे रहिवाशी असल्याचे दाखवण्यासाठी हजर केला असल्याने त्यास **नि. १३१** देण्यात येत आहे. (सदरच्या दाखल्यास निशाणी देण्यास वादीतर्फे विधिज्ञांनी आक्षेप नोंदविला. सदरचा आक्षेप अंतिम युक्तीवादाच्या वेळी ग्राहय धरला जाईल.)

सरतपास संपला.

**उलटतपास वादीतर्फे विधिज्ञ सौ. आर.पी.नाईक यांचेतर्फे**

मे. न्यायालयाची दुपार सत्राची वेळ संपल्याने उलटतपास पुढील तारखेपर्यंत तहकुब.

श्रवणोत्तर स्विकृत

सही/—

(एस्. ए. कानशिडे)

दिनांक :—२३/०९/२०१९. दिवाणी न्यायाधीश (क.स्तर), कुडाळ.